म. ग्रं. सं. ठाणे

विषय धर्म ५८

संग्रहालय क्रमांक १२

लेखक परशुरामपंत तात्या गोडबोले

पुस्तकाचें नांव श्री पांडुरंग स्तोत्र टीका

१२

धर्म

८६५
. ग्रं. मं. ठाणें
धर्म
५८
२८८५

श्री

# श्री पांडुरंग स्तोत्राची टीका.

परशुरामपंत तात्या गोडबोले

ह्यांनीं केली ती

दामोदर नारायण देव,

ह्यांनीं छापून प्रसिद्ध केली.

---

१८७९.

किंमत २ आणे.

श्री मच्छंकराचार्य कृत

# श्रीपांडुरंग स्तोत्राची टीका.

परशुराम पंत तात्या गोडबोले

मराठी त्रान्सलेटर ह्यांचे माजी पंडित

ह्यांनीं केली

ती

## दामोदर नारायण देव.

ह्यांनीं जनहितार्थ प्रसिद्ध केली.

---

मुंबई

शके १७९६ भावनाम संवत्सरे.

फ्यामेली प्रिंटिंग प्रेस.

# प्रस्तावना.

———000———

श्रीमच्छंकराचार्य कृत श्रीपांडुरंगाचें स्तोत्र संस्कृत असून त्याजवर प्राकृत टीका झालेली नाहीं. लोककल्याणार्थ या स्तोत्रावर प्राकृत टीका झाल्यानें ती प्राकृत भावीक जनांस श्रीपांडुरंगाचें प्रेमानें मनोमय ध्यान व पूजन करण्यास, आणि भक्तिमार्गास लावण्यास साहाय्यभूत होऊन, हें स्तोत्र अतिप्रिय होईल; एतदर्थ, मी हेतुपुर:सर कैलासवासी राजमान्य राजश्री परशुरामपंत तात्या गोडबोले यांजला विनंतीनें माझें मनोगत प्रकट केल्यावरून, त्यांणीं ह्या लोकोपयोगी सत्कृत्याकडे कृपा दृष्टीनें त्या टीकेच्या प्रारंभीं संक्षिप्त रीतीनें मूळ कथाभाग आणून, श्रीपांडुरंगाच्या स्वरूपादिकाचें वर्णन वाचकांचे मनांत निश्चयात्मक बिंबेल अशाप्रकारची सुरस शब्दांनीं युक्त, उत्तम प्रकारें प्राकृत टीका भावीक जना पुढें सादर करून, रसज्ञ वाचकांस हें स्तोत्र प्रेमानें पठन करण्याचा लाभ करून दिला, येणें करून मी त्यांचा फारच आभारी आहे.

ह्या स्तोत्राचे शेवटीं श्री तुकारामबावांचे अभंगांतील निवडक वेंचे, व विष्णुबावा ब्रह्मच्यारी यांच्या वेदोक्त प्रकाश ग्रंथांतील कांहीं उतारा वगैरे घेतला आहे, तिकडे सुज्ञवाचक अवश्य लक्ष देतील ही पूर्ण आशा आहे.

श्री ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी महान् महान् भगवद्भक्त, ज्ञान, भक्ति, वैराग्यशीळ आत्मज्ञानी, आणि निरभिमानी असे साधू होऊन गेले. श्री पांडुरंगाचे ठायीं त्यांची किती पूर्ण निष्ठा, दृढ भाव, भक्ति, प्रेम, पूजत्व बुद्धी, लीनता, दृढ श्रद्धा व पूर्ण विश्वास होता ! त्यांचा सर्वकाळ श्री पांडुरंगाचें प्रेमळ भावानें भजन व गुणानुवाद गाण्यामध्येंच जात असे. त्यांचे पंचहि प्राण त्यावर असून, सतत त्यांचें सर्व चित्त त्याच्याठायीं असे. येणेंकरूनच, ते श्रीपांडुरंगाचा अनुग्रह अनुभवून, त्याच्या पूर्ण प्रसादेंकरून ब्रह्मानंदांत रममाण होत्साते, भवभ्रांतिविरहित होऊन, कसे जीवन्मुक्त झाले व भवसमुद्राला तरून शाश्वत पद जें वैकुंठ त्याप्रत पावले; हें अनेक ग्रंथांवरून प्रसिद्ध आहे. तद्वत् भावीक, रसिक वाचकांनीं हें अमृततुल्य स्तोत्र मनोभावें पूज्य मानून, ह्या अनंत ब्रह्मांडाचा निर्मिता आणि खरा दयाळु मायबाप जो भक्तकाम क

ल्पद्रुम परमेश्वर पांडुरंग ( जो कृष्ण परमात्मा भगवान, ज्यास सगुण भक्तिच विशेष प्रिय आहे ) त्यासच अति विनम्र होऊन, अनन्य भावें शरण जाऊन, त्याचे भजनीं तल्लीन होत्साते, सर्वकाळ त्याचेच ठायीं आसक्त, व पूर्ण लक्ष व प्रेम ठेवून शुद्ध अंतःकरण युक्त निष्टापूर्वक भक्तीच्या योगें त्याच्या अनुग्रहास पात्र होऊन, ऐहिक शांति, समाधान, व सुख हीं अनुभवून मोक्षदायक त्याची अनादि व अपरिमित कृपाच संपादन करावी; हेंच श्रेयस्कर व उचित होय. यावरील लेखनाकडे आबाल वृद्धांनीं अवश्यमेव सावधान चित्तपूर्वक लक्ष पुरवावें, ह्मणून त्यांस परम नम्रतेनें व प्रेमबुद्धीनें करद्वय जोडून प्रार्थना आहे.

**दामोदर नारायण देव.**

ग्रं. ध. १४३

श्री

## श्रीगणेशायनमः

---

**श्री.**— श्री, ह्मणजे ईश्वराची शक्ति, परमाणू वगैरे अनेक गोलांस एका आकर्षणानें धरणारी तीच प्रथम आहे, व सर्वांहून श्रेष्ट आहे, तिचें श्री या नावानें प्रथम स्मरण.

**गणेशाय.**—गणेशाय, ह्मणजे सर्वांच्या इंद्रियगणांचा जो ईश, ह्मणजे धनी, आत्मा, त्याकारणें गणेश या नावानें.

**नमः**— नमः, ह्मणजे मी आपल्या आत्मस्वरूपानें नम्र आहें, ह्मणजे अभिमान टाकून शरण आहें.

---

श्री

श्री विठ्ठल प्रसन्न.

———ooo———

समचरणसरोजंसांद्रनीलांबुदाभं
जघननिहितपाणिंमंडनंमंडनानां ॥
तरुणतुलसिमालाकंधरंकंजनेत्रं
सदयधवलहासंविठ्ठलंचिंतयामि ॥

श्री पांडुरंगाचा अवतार कलियुगांतील अठ्ठाविसाव्या महर्युगांत झाला. हेंच लक्षून नामदेवानें आर्तींत लिहिलें आहे:—

युगींअठ्ठाविसींविटेवरीउभा ॥
वामांगीरखुमाईदिसेदिव्यशोभा ॥
पुंडलिकाचेभेटीपरब्रह्मआलेगा ॥
चरणींवाहेभीमाउद्धरीजगा ॥ १ ॥

भीमातिरीं एके गांवीं पुंडरीक नावाचा कोणी ब्राह्मण राहत होता. तो पितृभक्त असे, पित्याच्या सेवेवांचून त्याला

दुसरें कांहीं आवडत नसे. त्याणें पित्याची सेवा बहुत
एकनिष्टपणानें केली. हेंच त्याचें अति उत्कट तप झा
तें जाणून वैकुंठवासी श्रीविष्णु प्रसन्न होऊन त्या पुंडरीक
स वर देण्याकरितां भूलोकीं भीमातिरीं जेथें पुंडरीक हो
तेथें आला. त्यावेळेस पुंडरीक पितृसेवेंत तत्पर होता.
वाकडे पाहून पुंडरीक देवास ह्मणाला, पितृसेवा झाल्या
मी तुझ्याशीं बोलेन असें ह्मणून त्यानें देवाला बसावयास ए
मातीची वीट जवळ होती ती दिली. त्या विटेवर देव
भा राहिला. पितृसेवा संपल्यावर पुंडरीक हात जोडून
वास ह्मणाला, आपण कोण कशासाठीं येथें आलां.
ह्मणाला मी वैकुंठवासी विष्णु आहें. तुझी पितृभक्ति पा
मी फार संतोष पावलों आणि प्रसन्न होऊन तुला वर दे
करितां येथें आलों. तूं पाहिजे तो वर माग. तो तुला दे
मी जाईन. तेव्हां पुंडरीक बोलला, हे महा विष्णो जर तु
प्रसन्न होऊन मला वर देतां तर हाच वर द्या. कीं, ज
तुह्मी आतां मजपुढें विटेवर उभे आहां असेंच सर्वका
येथें उभे राहा. जाऊं नका. ह्मणजे तुमच्या दर्शनानें तु
चे भक्त कृतार्थ होतील. असें पुंडरीकाचें भाषण ऐकून
वाला प्रथम विचार पडला, परंतु तें मान्य करणें प्राप्त

ले. मग देवानें मनांत आणिलें कीं चैतन्य विग्रहानें सदो-
दित मानव लोकीं राहणें योग्य नाहीं आणि पुंडरीकासा-
रखें पुण्य इतर मानवांच्या पदरीं नाहीं. ह्मणून चैतन्य वि-
ग्रह सोडून पार्थिव देह धरून विटेवर तसेच अद्यापि उभे
राहिले आहेत. असा इतिहास आहे.

तोच मनांत आणून आचार्य प्रथम श्लोक लिहितात.

## श्लोक १

महायोगपीठेतटेभीमरथ्यां
वरंपुंडरीकायदातुंमुनींद्रैः ॥
समागत्यतिष्ठंतमानंदकंदं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ १ ॥

### पदान्वय.

महायोग पीठे भीमरथ्या स्तटे पुंडरीकाय वरंदातुं मुनींद्रैः सहसमागत्य तिष्टंतं, आनंदकंदं परब्रह्मलिंगं पांडुरंगं भजे.

**टीका.**—महायोग पीठि ह्मणजे ईश्वर प्राप्तीचा मोठा योग साधण्याचें स्थान असें, भीमरथ्या स्तटे ह्म० भमिा नदीच्या तिरीं ( जेथें पुंडरीक पितृसेवा करित होता तेथें )

मुनींद्रैः सह ह्म० बरोबर मोठे मोठे ऋषी घेवून (हे ऋ
साक्षी करितां आणिले असावे) पुंडरीकाय वरंदातुं ह्म०
डरीकास वर देण्याकरितां, तिष्ठंतं ह्म० येऊन उभा राहि
ला असा, आणि आनंदकंदं ह्म० आनंदाचें उत्पतिस्था
असा, आणि परब्रह्मलिंगं ह्म० साक्षात्परमेश्वर ज्याला
णतात असा जो पांडुरंगं ह्म० द्विभुज मूर्त्ति धारण क
आलेला महाविष्णु त्यातें भजे ह्म० मी भजतों त्याची स
करितों.

हें स्तोत्र भुजंग प्रयात वृत्तावर केलेलें आहे. प्रत्येक श्लो
काचा चतुर्थ चरण एकसारखाच आहे, ह्याचें कारण पां
डुरंगास भजण्याविषयीं मनास वारंवार स्मृति द्यावी हेंच आ
हे. ह्या स्तोत्राचे श्लोक आठ आहेत. पुढील सात श्लोकां
मागील वर्णिलेल्या पांडुरंगाचीं सर्व विशेषणें आहेत.

## श्लोक २

तडिद्वाससंनीलमेघावभासं
रमामंदिरंसुंदरंचित्प्रकाशं ॥

वरंत्विष्टिकायांसमन्यस्तपादं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ २ ॥

**टीका.**—पांडुरंग कसा आहे. तडिद्वाससं ह्म० तडित् ह्म० वीज तिच्यासारखें तेजस्वी आणि पीतवर्ण वस्त्र ज्याचें ( पीतांबरधर ) असा, आणखी नील मेघावभासं ह्म० सजल काळ्या मेघासारखी अंगकांति ज्याची ( मेघश्याम ) असा, आणखी रमा मंदिरं ह्म० लक्ष्मीचें क्रीडास्थान असा, आणखी सुंदरं ह्म० लावण्याची खाण असा, आणखी चित् प्रकाशं ह्म० चैतन्यरूप प्रकाशानें युक्त ( ज्ञानस्वरूप ) असा, आणखी वरं ह्म० श्रेष्ट ( पुरूषोत्तम ) असा, आणखी इष्टिकायां समन्यस्तपादं ह्म० पुंडरीकानें दिलेल्या विटेवर दोनी चरण ज्यानें सारखे जोडून ठेविले असा, जो पांडुरंग परमेश्वर त्यातें मी भजतों.

## श्लोक ३

प्रमाणंभवाब्धेरिदंमामकानां
नितंबःकराभ्यांधृतोयेनतस्मात् ॥

विधानुर्वसत्यैधृतोनाभिकोशः
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ ३ ॥

अन्वय.

मामकानां भवाब्धेः प्रमाणं इदं तस्मात् हेतोः येन क भ्यां नितं बोधृतः अथ च येन धातुर्व सत्यै नाभिकोशः धृ तं पांडुरंग भजे.

**टीका.**—मामक ह्म० माझे जे भक्त त्यांचा जो भवा ह्म० भवसार त्याचें प्रमाण हेंच हे दाखवण्याच्या हेतूनें ह्म० ज्या पांडुरंगानें आपल्या हातांनीं आपला नितंब धा ला आहे ह्म० कमरेवर हात ठेविले आहेत. माझ्या भक्तां भवाब्धि फार खोल नाहीं कमरे इतका आहे तो त्यांस हज उतरतां येईल, हें सुचविण्यासाठींच काय कमरेव हात ठेविले अशी उत्प्रेक्षा; आणि ब्रह्मदेवास वसतिस्था मिळावें ह्मणून ज्यानें नाभिकोश ह्म० कमलकोशाकार नाभि स्थान अंगीकारिलें असा जो दयाळू परमेश्वर पांडुरंग त्या मी भजतों.

## श्लोक ८

स्फुरत्कौस्तुभालंकृतंकंठदेशे
श्रियाजुष्टकेयूरकंश्रीनिवासं ॥
शिवंशांतमीड्यंपरंलोकपालं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ ८ ॥

**टीका.**—आणखी पांडुरंग कसा आहे. कंठ देशे स्फुरत्कौस्तुभालंकृतं. ह्म० देदीप्यमान जो कौस्तुभ मणि (चवदा रत्नांतील रत्न) तेणेंकरून कंठप्रदेशीं अलंकृत. ह्म० ज्याच्या कंठांत कौस्तुभ रत्नाचा अलंकार विराजमान आहे असा, आणि श्रियाजुष्ट केयूरकं ह्म० शोभेनें युक्त असें केयूर ह्म० बाहुभूषण ज्याचें आहे असा, आणि श्री निवासं ह्म० लक्ष्मीचें किंवा शोभेचें मुख्य स्थान असा, आणि शिवं ह्म० भक्तांस कल्याण देणारा असा, आणि शांतं ह्म० निरुपाधिक असा, आणि ईड्यं ह्म० देवासुर नरांनीं निजकल्याणार्थ स्तवायास योग्य असा, आणि परं ह्म० मायातीत परमात्मा असा, आणि लोकपालं ह्म० चतुर्दश लोकांचा

पालन कर्ता असा जो भक्तकामकल्पद्रुम परमेश्वर पांडु
त्यातें मी भजतों.

## श्लोक ५

शरच्चंद्रबिंबाननंचारुहासं
लसत्कुंडलाक्रांतगंडस्थलांगं ॥
जपारागबिंबाधरंकंजनेत्रं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥५॥

**टीका.**—आणखी पांडुरंग कसा आहे. शरच्चंद्र बिंबा ननं ह्म० शरदृतूंतील पूर्णिमा तिथीचें जें स्वच्छ, चंद्र मंडळ तद्वत् शोभायमान व आल्हादकारक मुख ज्याचें असा, आणि चारुहासं ह्म० स्वाभाविक मनोहर हास्य ज्याचें असा, आणि लसत्कुंडलाक्रांत गंडस्थलांगं ह्म० शोभायमान रत्नकुंडलाच्या कांतीनें व्याप्त झाला आहे गंडप्रदेश ज्याचा असा, आणि जपाराग बिंबाधरं ह्म० जासवनीच्या फुलाच्या रंगासारखे रक्तवर्ण जें पिकलेलें तोंडलें त्यासारखे ज्याचे ओठ रक्तवर्ण असा, आणि कंजनेत्रं ह्म० नवफुल्ल कमलासारखे

शोभणारे ज्याचे नेत्र आहेत असा जो सुंदर परमेश्वर पांडु-
रंग त्यातें मी भजतों.

## श्लोक ८

किरीटोज्ज्वलत्सर्वदिक्प्रांतभागं
सुरैरर्चितंदिव्यरत्नैरनर्घ्यैः ॥
त्रिभंगाकृतिंबर्हमाल्यावतंसं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ ८ ॥

**टीका.**—आणखी पांडुरंग कसा आहे. किरीटोज्ज्वलत् सर्व दिक् प्रांत भागं ह्म० मुकुटाच्या कांतीनें प्रकाशित केले दिक्प्रांत भाग दशदिशा ज्याणें असा, आणि सुरैर नर्घ्यैः दिव्यरत्नैः अर्चितं ह्म० अमूल्य जीं दिव्य रत्नें तीहीं करून देव ज्याचें अर्चन पूजन करतात असा, आणि त्रिभंगाकृतिं ह्म० तिहीं ठिकाणीं (पाद कटी ग्रीवा यांत) वक्रता पावली आहे आकृति ह्म० शरीराकृति ज्याची असा, ही आकृति वेणुवादन समयीं होते. आणखी बर्हमाल्या वतंसं ह्म० मयूर पिच्छें आणि वन्य पुष्पें यांणीं ज्याचा मुकुट केला आहे असा. या दोन विशेषणांनीं गोकुलांतील कृष्णा-

शीं अभेद सुचविला आहे. त्या मुरलीधर पांडुरंगातें भजतों.

## श्लोक ७

विभुंवेणुनादंचरंतंदुरंतं
स्वयंलीलयागोपवेशंदधानं ॥
गवांवृंदकानंददंचारुहासं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ ७ ॥

टीका.—ह्या श्लोकांत गोकुल विहारी श्रीकृष्णाशीं अभेद दाखविला आहे. आणखी पांडुरंग कसा आहे. विभुं ह्म० सर्वव्यापी असा, आणि वेणुनादं चरंतं ह्म० वेणुवाद्य करणारा किंवा वेणुनाद ह्मणून जें क्रीडास्थान तेथें विहार करणारा असा, आणखी दुरंतं ह्म० ज्याच्या गुणांचा किंवा रूपाचा अंतपार लागत नाहीं असा, आणखी स्वयं लीलया गोपवेशं दधानं ह्म० आपण ईश्वर असून लीलेनें स्वयें ज्यानें गोपवेश धरला आहे ह्म० नंदगोपाचा पुत्र होऊन आपण गोपासारिखें आचरण करितो असा, आणखी गवांवृंदकानंददं ह्म० नवलक्ष गायींच्या समुदायाला

११ सं. ध. १२३

लालनादिकेंकरून आनंद देणारा असा, आणि चारुहासं ह्म० गोपांशीं विनोदकाळीं सुंदर हास्य करणारा असा जो गोकुलविहारी पांडुरंग परमेश्वर त्यातें मी भजतों.

## श्लोक ८

अजंरुक्मिणीप्राणसंजीवनंतं
परंधामकैवल्यमेकंतुरीयं ॥
प्रसन्नंप्रपन्नार्तिहंदेवदेवं
परब्रह्मलिंगंभजेपांडुरंगं ॥ ८ ॥

**टीका.**—आणखी पांडुरंग कसा आहे. अजं ह्म० जन्मादि षड्विकार शून्य असा, आणखी रुक्मिणी प्राण संजीवनंतं ह्म० रुक्मिणी जी स्त्री निजमाया तिच्या प्राणांचें रक्षण करणारा (रुक्मिणी प्राण वल्लभ) असा, आणि परंधाम ह्म० निर्बाध जें तेज तद्रूपी असा, आणि कैवल्यं ह्म० जीवेश्वराचें ऐक्य तोच मोक्ष तद्रूपी असा, आणखी एकं ह्म० एकरूप अद्वितीय असा, आणि तुरीयं ह्म० जागृत स्वप्न सुषुप्ति ह्या तीन अवस्थांहून निराळी जी आनंदरूप चतुर्थावस्था तिचा साक्षी असा, आणि प्रसन्नं ह्म० भक्तांवर प्र-

साद करणारा असा, आणि प्रपन्नार्तिहं ह्म० शरणा
दुःख दूर करणारा असा, आणखी देवदेवं ह्म० ब्रह्म
सर्वदेवांचा देव असा जो भक्तवत्सल पांडुरंग त्यातें मी भ

## श्लोक ९

स्तवंपांडुरंगस्यवैपुण्यदंये
पठंत्येकचित्तेनभक्त्याचनित्यं॥
भवांभोनिधिंतेपितीर्त्वांतकाले
हरेरालयंशाश्वतंप्राप्नुवन्ति ॥ ९ ॥

**अर्थ**.— ह्या श्लोकानें पूर्वोक्त स्तोत्राची फलश्रुति
गितली आहे. पुण्य देणारा असा जो हा पांडुरंगाचा पू
क्त स्तव, जे कोणी मानव एकचित्तानें, भक्तीनें, आणि नि
नित्य पठन करितात, ते मानव निश्चयें करून भवसमुद्रा
सहज तरून मरणा नंतर शाश्वत ह्म० अविनाशि जे
ष्णूचें स्थान ह्म० वैकुंठ त्या प्रत पावतात.

——००——

# श्री मद्भगवद्गीता सार.

## अध्याय ५.

श्रीकृष्णनाथायनमः ॥ पार्थामजचिध्यायीजे ॥ अनायासें मिळेलतेंमजसमर्पिजे ॥ माझियास्वरूपाओळखिजे ॥ तेंचिआत्मज्ञान ॥ १ ॥ जैसेंसुखदुःखआपुलेदेहीं ॥ तैसेंचसर्वांभूतींपाहीं ॥ तरीचतूंठायींच्याठायीं ॥ नित्रसीलपार्था ॥ २ ॥ आपणातेंनमावें ॥ कामक्रोधातेंदंडावें ॥ मदमत्सरखंडावें ॥ तरी पावावेंपरमसुख ॥ ३ ॥ आशामनतृष्णा ॥ कल्पनाइच्छावासना ॥ दंडावेंइंद्रियमना ॥ तरीचस्वात्मसुखपावसी ॥ ४ ॥ आसनींशयनींभोजनीं ॥ विसरनाहींमाझियेस्मरणीं ॥ त्यानावेंआत्मज्ञानी ॥ बोलिजेपार्था ॥ ५ ॥ ऐसेजेनेमींराहिले ॥ तेआत्मसुखपावले ॥ जेआचाराभंगले ॥ तेलाधलेदुःखजाण ॥ ६ ॥ इतिश्रीभगवद्गीता ॥ व्यासदेवनिरूपिता ॥ प्राकृतजाणआतां॥ ह्मणेज्ञानदेव ॥ ७ ॥ इतिपंचमअध्यायसंपूर्ण ॥ ॥

## अध्याय १७.

**श्रीभग०**— अश्रद्धयाहुतंदत्तंतपस्तत्पंकृतंचयत् ॥
असदित्युच्यतेपार्थनचतत्प्रेत्यनोइह ॥ २८ ॥

**श्रीमद्वामन पंडित कृत टीका.**– श्रद्धेवांचूनिंहोमिलें धलेंतपकेलें ॥ अथवाकांहींसत्कर्मकेलें ॥ तेंअसतूह्मणजेंवाईट लिलें ॥ अगापार्था ॥ १ ॥ तेंफलनेदीमेलियाउपरी ॥ अथवाजी हीआहेजोंवरी ॥ ईश्वरप्रसादासेंहेतूहीनकरी ॥ व्यर्थचितें ॥ २ ॥ सर्वासकारणपार्था ॥ श्रद्धाअसावीसर्वथा ॥ अश्र नेंकेलेंतितुकेंवृथा ॥ ह्मणेदेवाधिदेव ॥ ३ ॥

## भागवत श्लोक.

सत्वंनचेद्धातरिदंनिजंभवेद्विज्ञानमज्ञानभिदापमार्जनं ॥
गुणप्रकाशैरनुमीयतेभवान्प्रकाशतेयस्यचयेनवागुणः ॥ १

**टीका**— शुद्धसत्वेंअवतार ॥ देवातूंकरितोसिह्याविचार बोलतांब्रह्माआणिशंकर ॥ अग्रगण्यदेवांतहेवदती ॥ १ ॥ हेंनिजसत्वतुझेंहरी ॥ प्रगटनह्योयरामकृष्णादिरूपेंजरी ॥ अ ननाशकविज्ञानतरी ॥ नव्हेजनांतेंजीदेवा ॥ २ ॥ कीं श्रव कीर्तन ॥ तुझ्यागुणाचेंचिंतन ॥ आणिसत्वमूर्तीचेंभजन ॥ करितांमननिर्मळनहोय ॥ ३ ॥ निर्मळनहोतांमन ॥ नव्हे क्षात्कारअनुभवज्ञान ॥ तेव्हांननाशेअज्ञान ॥ हाविचारमागें तेंचिवदलें ॥ ४ ॥ याभावेंह्मणतीयाश्लोकींहरी ॥ सत्वतुझें वतरेजरी ॥ अज्ञाननाशकविज्ञानतरी ॥ नव्हेकधीं ॥ ५

आतांआपणासआपण ॥ नजाणणेंहेंअज्ञानाचेंलक्षण ॥ आणि
जडप्रकाशकआत्मपण ॥ कळणेंज्ञानहें ॥ ६ ॥

---

## श्री तुकाराम कृत अभंग.

गातोंवासुदेवमीऐका ॥ चित्तठायींठेउनिभावएका ॥ डोळेझां
कोनिरात्रकरूंनका ॥ काळकरितबसलासेलेखागा ॥ १ ॥ रा
मरामस्मराअधीं ॥ लाहोकरागांठघालामुळबंदी ॥ सांडावाउ
गयाउपाधी ॥ लक्षलाऊनियांराहागोविंदींगा ॥ २ ॥ अल्पआ
युष्यमानवदेहे ॥ शतगणिलेंतेंअर्धरात्रखाये ॥ पुढेंबाळत्वपीडा
रोगक्षय ॥ कायभजनातेंउरलेंतेंपाहेगा ॥ ३ ॥ क्षणभंगुरनाहींभ
रंवसा ॥ व्हारेसावधतोडामायाआशा ॥ कांहींनचलेमगगळां
पडेलफांसा ॥ पुढेंहुशारथोरआहेबोळसागा ॥ ४ ॥ कांहींथोडे
बहुतलागपाठ ॥ कराभक्तिभावधराबळकट ॥ तनमनध्यानद्या
लाउनियांनीट ॥ जरिकरणेअसेलगोडशेवटगा ॥ ५ ॥ विनवि
तोंसकळजना ॥ करजोडोनिथोरलाहाना ॥ दानइतुलेंचिद्या
मजदीना ॥ ह्मणेतुकयाबंधुरामह्मणागा ॥ ६ ॥

लागोनीयापायांविनवितोंतुह्माला ॥ करटाळीबोलामुखींनाम ॥ १ ॥
विठ्ठलविठ्ठलह्मणावेळोवेळां ॥ हासुखसोहळास्वर्गींनाहीं ॥ २ ॥

कृष्णाविष्णुहरिगोविंदगोपाळ ॥ मार्गहाप्रांजळवैकुंठीचा ॥३॥
सकळांसींयेथेंआहेअधिकार ॥ कलियुगींउद्धारहरिनामें ॥ ४ ॥
तुकाह्मणेनामापासींचारीमुक्ति ॥ ऐसेंबहुताग्रंथींबोलीयेलें ॥ ५ ॥

जाणेभक्तीचाजिव्हाळा ॥ तोचिदैवाचापुतळा ॥ १ ॥ आणी
कनयेमाझ्यामना ॥ होकापंडितशाहाणा ॥ २ ॥ नामरूपींजड
लेंचित्त ॥ त्याचादासमीअंकित ॥ ३ ॥ तुकाह्मणेनवविध ॥
भक्तिजाणेतोचिशुद्ध ॥ ४ ॥

नरदेहायावेंहरीदासव्हावें ॥ तेणेंचूकवावेंगर्भवासा ॥ १ ॥ ना
हींतरीवायांशीणवीलीमाय ॥ नरकासीजायजन्मोजन्मीं ॥ २ ॥
तीर्थव्रतदानदेवाचेंपूजन ॥ ऐसेंहेंसाधनसाधकाचें ॥ ३ ॥ तु
काह्मणेमुखींनित्यह्मणेहरी ॥ तयासुखासरीनाहींपार ॥ ४ ॥

हरितुझेंनामगाइनअखंड ॥ याविणपाखांडनेणेंकांहीं ॥ १ ॥
आतांतरिविश्वासअखंडनामाचा ॥ कायामनेंवाचादेईहेंची ॥ २ ॥
तुकाह्मणेआतांदेईसंतसंग ॥ तुझेनामींरंगभरोमना ॥ ३ ॥

कासयागामजघातलेंसंसारीं ॥ चित्तपायांवरीनाहींतुझ्या ॥ १ ॥
कासयागामजघातलेंह्याजन्मा ॥ नाहींतुझाप्रेमानित्यनवा ॥ २ ॥
नामावीणमाझीवाचाअमंगळ ॥ ऐसाकांचांडाळनिर्मीयेला ॥३॥
तुकाह्मणेमाझीजळोजळोकाया ॥ विठ्ठलासखयावांचूनीयां ॥ ४ ॥

विठ्ठल, या शब्दाचा अर्थ— वि ह्म० विधाता जाण, ठ ह्म० नीळकंठ पूर्ण, ल ह्म० तोचि लक्ष्मी नारायण, तिघे देव मिळोनि विठ्ठल एक ब्रह्मा, विष्णु, महेश्वर, तिघा देवाचा अवतार, तो हा विठ्ठल निर्विकार, कटीकर ठेवोनी उभा असे.

---

## वेदोक्तधर्म प्रकाश ग्रंथांतील

### नवविधा भक्तीचा प्रकार.

रामकृष्ण अवतार हीं ईश्वरानें जगदुद्धारार्थ सकौतुक करून देणारीं लीला रूपें धरिलीं आहेत, तो ईश्वर सर्वकाळ आहे. सगुण साकार अवतार जे भगवंतानें धरिले, त्याचे भक्तीचे ह्मणजे उपासनेचे नऊ प्रकार आहेत, यामुळें नवविधा भक्ति ह्मणतात.

**श्लोक.**— नवविधा भक्तीचा. "श्रवणं, कीर्तनं, विष्णो स्मरणं, पादसेवनं, अर्चनं, वंदनं, दास्यं, सख्य, मात्मनिवदनं."

१ परमेश्वर प्राप्तीचे ग्रंथ ( श्रीमद्भगवद्गीता, श्रीमद्भागवत, श्रीविष्णु सहस्रनाम इ० ) प्रीतीनें ह्मणजे भक्तीनें श्रवण करणें, हीच पहिली श्रवण भक्ति. २ परमेश्वराची कीर्ति अतिप्रीतीनें, ह्मणजे अतिशय भक्तीनें लोकांस सांगणे हीच दुसरी कीर्तन भक्ति. ३ परमेश्वराचें प्रीतीनें वारंवार स्मरण करणें, हीच तिसरी स्मरण भक्ति. ४ निराकार प-

रमेश्वराचा बोध ज्यांच्या ज्ञानांत अवतरला, ह्मणजे उदयास आला, तेच अवतार समजावे. व त्यांची अतिप्रीतीनें सेवा (चाकरी) करणें हीच पादसेवन चवथी भक्ति. ५ अयोनि संभव जे राम, विष्णु, कृष्णादिक अवतारी पुरुष निर्माण झाले, त्यांचें एकाग्र चित्तानें ध्यान केले असतां, ते ध्यान करणाऱ्याच्या ज्ञानांत प्रकट होऊन, तारक ज्ञानाचा उपदेश करून, पातक अज्ञान घालवितात; यास्तव त्यांच्या देहाकृति सारखी, चक्षुरिंद्रियाचे अंतर्भागांतील सूक्ष्म प्राण वायुरूप तत्वाची आकृति, व पूजा उपचार, अतिप्रीतीनें कल्पित करणें, व मनोमय करण्याची हतवटी सलाल्या कळावी, ह्मणून बाह्यप्रतिमा मांडून, प्रेमानें सुगंध पुष्पादिक पूजा उपचार करणें, हीच पांचवी अर्चन भक्ति. ६ जेवढीं परमेश्वर प्राप्तीचीं साधनें आहेत, त्यांतून लहान अथवा मोठ्या हरएक साधनांची निंदा न करितां, त्या सर्व साधनांचा परिणाम परमेश्वर प्राप्तिकडे आहे, असें समजून तीर्थ यात्रादिक धर्मसंबंधीं सर्व साधनें वंद्य आहेत, असे प्रीतीनें लोकांस सांगणें, व स्वत त्या सर्व साधनांस प्रीतीनें मान देणें, हीच सहावी वंदन भक्ति. ७ जसा राजाचा विश्वासू चाकर राजाकरितां प्राण ही खर्च करितो, तसा परमेश्वर

गोत्यर्थ प्राणांत ओढवला तरी परमेश्वराच्यच विश्वासांत देह व आयुष्य खर्ची घालणें. हीच सातवी ास्य भक्ति. ८ परमेश्वरा वांचून अन्य पदार्थावर स्नेह न ठेवि परमेश्वरावरच सख्यत्व ह्मणजे स्नेह ठेवणें. हीच आठ सख्य भक्ति. ९ निराकार परमेश्वर, जो आपल्या आजूच्या अनंत पोकळीचें पोकळीपण मिथ्या करणारा अचल व कार विरहित निराकार तत्व आहे, त्याला प्रीतीनें देहांत प्राणवायूचें आंत जे आपले पोकळीच्या तत्वांसारखें ज्ञान स्वरूप आहे, त्याच्या आंत परिपूर्ण आपआपल्या ज्ञानाच्या अस्तित्वा पूर्वींचा जो आपआपला अस्तित्व भाव आहे, तो, आणि अचलतत्व निराकार परमेश्वर, उभयता एकरूप आहे, असें अनुभवून, अनुभविणारे लक्षण, अनुभवित्या ज्ञाना सहित प्रीतीनें लीन करणें. हीच आत्म निवेदन भक्ति आहे.

ह्या प्रकारची नवविधा भक्ति ह्मणजे नऊ प्रकारानें उपासना आहे, तिचे नऊ प्रकार सांगितले त्याप्रमाणें आचरण करावें.

---

**मंत्र.**— मंत्र ह्मणजे ईश्वराच्या स्वरूपीं लक्ष कसें लावावें या बोधाचे शब्द आहेत.

रामनाम स्मरावें, ह्मणजे, "रमंतेयोगिनोअस्मिन् इतिरामः" ह्मणजे अहंपण धरणाऱ्या ज्ञानां पूर्वींच्या निराकार स्वकीय

स्वरूपीं योगी, विचारानें, व आपणास आपण चिंतिणें याला धारणा ह्मणतात, या धारणेनें, रममाण होतात, आणि जन्ममरण भयापासून तरून जातात, यास्तव निराकार परब्रह्म परमात्म्याला राम ही संज्ञा आहे. त्या रामाचा नामोच्चार करणें, व राम अवताराचें शामसुंदर सावयव ध्यान करणें, व राम अवतार धरणाऱ्या ईश्वर रूपीं समष्टी ज्ञानाच्या आधींचें जें त्याचें निराकार रामरूप, तेंच अहंपण धरणाऱ्या ज्ञाना पूर्वीं मी मी ह्मणणें, व ह्मणणारे नसतां सहज आहे असें धारणेनें ह्मणजे दुसऱ्यास चिंतिणें याचें नांव ध्यान, व आपणास आपण निराकार पणानें चिंतिणें याचें नांव धारणा अशा धारणेनें अहंपण धरणाऱ्या ज्ञाना पूर्वींचा राम व मी एक आहें असें स्मरावें, हेंच रामाचें अनन्य स्मरण समजावें. हें स्मरणच तारक ज्ञान आहे. यास्तव हा तर रामनाम मंत्र सुलभ अक्षरांचा व गोड आहे. हा मनुष्य मात्रांनीं शरीरानें शुचि अशुची वगैरे कोणत्याकाळीं कधींच विसरूं नये, व **रामनामोच्चार** करावा, व साकार राम अवताराचें ध्यान करावें, व निराकारीं आपलें ऐक्य पहावें, ह्मणजे वेदशास्त्रादिकांचें सर्व फल सिद्ध झालें.

समाप्त.